क्रमांक : २१६ /ई-१ कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक : 05 JAN 2022

: : परिपत्रक : :

विषय : महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन २०२१ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील तारांकित स्वीकृत प्रश्न फेरविचारांती अतारांकित स्वीकृत केल्याबाबत...

संदर्भ : (१) या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १६८७२/ई-१ कक्ष, दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१
(२) या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १८५९६/ई-१ कक्ष, दिनांक ६ डिसेंबर, २०२१

महाराष्ट्र विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या सोमवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२१ रोजी बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेचे हिवाळी अधिवेशन बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ ते मंगळवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२१ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. अधिवेशन कालावधीत बदल झाल्यामुळे मंगळवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२१ ते सोमवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२१ या कालावधीतील तारांकित स्वीकृत प्रश्न संदर्भ क्र.२ वरील परिपत्रकातील विवरणपत्रामध्ये नमुद केलेल्या सुधारित दिनांकाप्रमाणे प्रश्नोत्तरांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत.

पूर्वनियोजित अधिवेशनाकरिता निर्गमित केलेल्या संदर्भ क्र.१ वरील परिपत्रकातील विवरणपत्रामध्ये दर्शविलेले मंगळवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२१ ते शुक्रवार, दिनांक १७ डिसेंबर, २०२१ या कालावधीतील सर्व तारांकित स्वीकृत प्रश्न विभागाकडे यापुर्वीच पाठविण्यात आले आहेत.

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार मंगळवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२१ ते शुक्रवार, दिनांक १७ डिसेंबर, २०२१ या कालावधीतील सर्व तारांकित स्वीकृत प्रश्न आता फेरविचारांती अतारांकित स्वीकृत करण्यात आले आहेत. अशा सर्व प्रश्नांची उत्तरे महाराष्ट्र विधानपरिषद नियम ७० (२) अन्वये प्रश्न शासनास मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत या सचिवालयास पाठविण्यात यावीत.

( राजेश तारवी )
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :

(१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव (तीन प्रती)
(२) मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव (तीन प्रती)
(३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (तीन प्रती)
(४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई प्रत्येकी (तीन प्रती)
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित